# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेस नोट

- **प्लास्टिक वापरावर आणि विक्री करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे सत्र सुरूच मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाची कठोर भूमिका**

प्लास्टिक पर्यावरणाला खूप हानिकारक आहे तसेच प्लास्टिकचे विघटन होण्यास बराच वेळ लागतो म्हणूनच मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरातील एकल प्लास्टिक वापरास प्रतिबंध घालण्यासाठी सतत जनजागृती करीत असून एकल प्लास्टिक वापर विरोधात विविध मोहिमा राबवित आहे तरीसुद्धा शहराच्या विविध भागांमध्ये नागरिक, दुकानदार, टपरीवाले आणि फेरीवाले सर्रासपणे प्लास्टिकचा वापर करताना दिसतात.

एकल प्लास्टिक वापरावर चाप बसावा म्हणून मिरा-भाईंदर प्रशासनाने आणखीन कठोर पाऊल उचलायला सुरुवात केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र .से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा स्वच्छता निरीक्षकांचे एक विशेष भरारी पथक महानगर पालिका क्षेत्रात कठोर कारवाई करीत आहेत.महानगर पालिका क्षेत्रातील ६ हि प्रभागांमध्ये चालू असलेली एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिम आता आणखी कठोर केली असून यामध्ये अनेक दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. पहिला गुन्हा ५००० रुपये, दुसरा गुन्हा १०,००० रुपये आणि तिसरा गुन्हा २५००० रुपये इतका दंड आकारला जात आहे.

मागच्या ११ महिण्यात एकल प्लास्टिक वापर करणाऱ्यावर एकूण ४५,८०,००० एवढा दंड आकारण्यात आला आहे तर मागच्याच महिन्यात म्हणजेच नोव्हेंबर २४ मध्ये एकूण १८,३७,४०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. जानेवारी २४ पासून आतापर्यंत साधारण ९१४ दुकानावर दंडात्मक कारवाई केली आहे गेल्या ११ महिन्याच्या या कारवाईत १३७४ किलोग्रम प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे .या विशेष कारवाईत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी असे मिळून १२० जणांचा एक विशेष भरारी पथक सतत कार्यरत आहे

या कठोर दंडात्मक कारवाईमुळे मिरा-भाईंदर शहरात एकूणच प्लास्टिक वापरावर नक्कीच नियंत्रण मिळवले जाईल. यामुळे शहराच्या पर्यावरणाची गुणवत्ता सुधारेल आणि नागरिकांना एक स्वच्छ, सुंदर, निसर्गरम्य आणि पर्यावरणपूरक वातावरण शहरात अनुभवता येईल.